# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ५ वे अंक ७८ शनिवार दि.२७ सप्टेंबर २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## जोशी वासुदेव समाजाचे सर्व प्रश्न मार्गी लावणार : माजी मंत्री आ.संजय बनसोडे

उदगीर : उदगीर मतदार संघात विविध जाती धर्माचे लोक एकोप्याने राहतात हीच उदगीर मतदार संघाची ओळख आहे. उदगीर शहरात विविध धार्मिक सण व उत्सव मोठ्या उत्साहाने एकत्र येऊन गुण्यागोविंदाने साजरे केले जातात. त्यातच जोशी वासुदेव समाज हा अनेक पिढ्यापासुन आपल्यासोबत आहे. मुळ ते कृष्णाचे अनुयायी असुन विविध व्यापार व व्यावसाय करुन ते त्यांचा उदरनिर्वाह करतात. भविष्यात जोशी वासुदेव समाजाचे सर्व प्रश्न मार्गी लावणार असल्याचे मत माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांनी व्यक्त केले. ते उदगीर शहरात आयोजीत जोशी वासुदेव समाजाच्या वतीने सत्कार समारंभ प्रसंगी बोलत होते.



या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त उपशिक्षण अधिकारी हरिश्चंद्र अनवले, प्रा.शाम डावळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष बालाजी भोसले, शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ, माजी नगरसेवक सुधीर भोसले, मनोज पुदाले, ॲड. दत्ता पाटील, अनिरुद्ध गुरुडे, आदित्य गोरे, नरसिंग शिंदे, अमर सूर्यवंशी, एकनाथ गोजेगावे, प्रा. कृष्णराज अनवले, सुभाष वाकुडे, नारायण वाकुडे, प्रशांत मांगुळकर, ज्ञानेश्वर निंबाळकर, सूर्यकांत वाकुडे, अशोक वाकुडे, तेजराव हादवे, अभिमन्यू घोगरे, अशोक हादवे, राजू भोरे ,गंगाधर घोगरे , भीमसेन घोगरे, गजानन घोगरे, गंगाधर वाकुडे, सरपंच यादव केंद्रे, लक्ष्मण कुंडगीर, महादेव अनवले, शिवाजीराव धुर्वे, रमाकांत घोटकर आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना आमदार संजय बनसोडे यांनी, गेल्या दहा अकरा वर्षापासून उदगीर मतदार संघातील जनतेच्या सेवेत असून आपण सर्वांनी मला पहिल्यांदा आमदार केले व पक्षश्रेष्ठींनी मंत्रिपदाची संधी दिली त्या संधीचे सोने केवळ मतदार संघातील जनतेच्या विकासासाठी केल्यानेच आपण सर्वांनी मला दुसऱ्यांदा मोठ्या मताधिक्याने निवडून दिलात. मी नशीबवान लोकप्रतिनिधी असून उदगीर मतदार संघातील जनतेने माझ्यावर भरभरून प्रेम केले आहे. लोकप्रतिनिधी झाल्यानंतर मागील ५ वर्षाच्या कार्यकाळात मतदार संघात विकासाची गंगा खेचुन आणली. मतदारसंघातील सर्व जाती धर्मांना न्याय दिला त्यासोबतच जोशी वासुदेव समाजाचा मागील अनेक वर्षापासूनचा समशानभूमीचा प्रश्न मार्गी लावुन त्यासाठी निधी उपलब्ध करून दिला त्याचे कामही पूर्ण झाले. या प्रभागातील नागरिकांना विविध मूलभूत सुविधा पुरविल्या येत्या काळात नगर परिषदेच्या निवडणुका पार पडणार आहेत. यावेळी अनेक विरोध येतील भुल थापा मारतील त्यामुळे आपण सुज्ञ नागरिक आहात अशा विरोधकांच्या भुल थापांना बळी पडू नका व काम करणाऱ्या कार्यकर्तेंच्या पाठीमागे आपण खंबीरपणे उभे रहावे असे आ.संजय बनसोडे यांनी सांगितले.

## नायगाव ता. कळंब, जि. धाराशिव) येथे पांडुरंग पेट्रोलियम विक्री व सेवेचा शुभारंभ




लातूर :- मुरुड पासून जवळच असलेले नायगाव (ता. कळंब) येथे पांडुरंग पेट्रोलियम विक्री व सेवा केंद्राचा भव्य शुभारंभ पार पडला. या प्रसंगी अशोक हनवते संपादक दैनिक महावृत्त तथा जिल्हा सरचिटणीस महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई जिल्हा शाखा लातूर यांनी पांडुरंग पेट्रोलियमचे सर्वेसर्वा सुरज साखळे, निखिल साखळे यांचे पुष्पगुच्छ देऊन हार्दिक स्वागत केले. हा उपक्रम स्थानिक नागरिकांना इंधन सुविधा पुरविण्यासोबतच रोजगाराच्या संधी देखील उपलब्ध करून देणार आहे. उद्घाटन समारंभ प्रसंगी अनेक मान्यवर उपस्थित होते. या नव्या उपक्रमासाठी सुरज साखळे यांना पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा!

## विलास सहकारी साखर कारखान्याची २३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा; २९ सप्टेंबर रोजी लातूर येथे

विलास कारखान्याच्या वार्षिक सभेचे स्थळ बदलले;
अतिवृष्टीमुळे हॉटेल वैष्णव येथे आयोजन

विलास सहकारी साखर कारखाना लि., वैशालीनगर, निवळी, ता. जि. लातूर यांच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची सन २०२४-२५ या वर्षाची 'अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा' ही सध्या सुरू असलेल्या सततच्या अतिवृष्टीमुळे नियोजित ठिकाणी होऊ शकत नाही. त्यामुळे सभेच्या स्थळामध्ये बदल करण्यात येत आहे. सभेची तारीख आणि वेळ कायम राहील, मात्र स्थळामध्ये बदल झाला आहे. नवे स्थळ : हॉटेल वैष्णव, बँक्वेटस् हॉल, साई नाका, 'डी' मार्ट रोड, लातूर येथे होणार आहे.

लातूर / प्रतिनिधी :- सहकार आणि साखर उद्योगामध्ये पथदर्शी ठरलेल्या विलास सहकारी साखर कारखाना लि.,ची सन २०२४-२५ या वर्षाची अधिमंडळाची २३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार, २९ सप्टेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आली आहे. कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशाली विलासराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा दुपारी १ वाजता संपन्न होईल. विलास सहकारी साखर कारखाना ग्रामीण भागातील शेतकरी आणि कष्टकरी यांच्या आशा-आकांक्षांचे प्रतीक आहे. सध्या सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे सभेच्या स्थळात बदल करण्यात आला असून, ही सभा लातूर येथील हॉटेल वैष्णव, बँक्वेट हॉल, साई नाका, डीमार्ट रिंगरोड, लातूर येथे होणार आहे. प्रमुख नेत्यांची उपस्थिती आणि विशेष प्रशिक्षण या वार्षिक सर्वसाधारण सभेस कारखान्याचे मार्गदर्शक माजी मंत्री सहकारमहर्षी दिलीपराव देशमुख, राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख, खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, खासदार डॉ. शिवाजी काळगे, आमदार कैलास घाडगे पाटील आणि जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या सर्वसाधारण सभेस उपस्थित राहणाऱ्या सभासद शेतकऱ्यांसाठी सकाळी १० ते १ वाजता सभेच्या स्थळी कृषिरत्न डॉ. संजीव माने यांचे ऊस लागवड तंत्रज्ञान व खोडवा व्यवस्थापन, खत व्यवस्थापन, कीड व रोग व्यवस्थापन तसेच ऊसरोप





लागवडयावर विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कारखान्याचे व्हाईस चेअरमन वैजनाथराव शिंदे, सर्व संचालक आणि कार्यकारी संचालक आबासाहेब पाटील यांनी अधिमंडळाची २३ वी वार्षिक सर्वसाधारण सभेस सर्व सभासदांना सभेसाठी वेळेवर उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

## पुरामुळे खरडून गेलेल्या जमिनीचे अचूक पंचनामे करा-महसूल राज्यमंत्री योगेश कदम

### नुकसानीची मदत जमा होणारे बँक खाते होल्ड करू नका

लातूर :- अतिवृष्टी आणि पुरामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. या मदतीपासून एकही शेतकरी वंचित राहू नये, यासाठी नुकसानीचे पंचनामे, सर्वेक्षण काळजीपूर्वक करावे. पुरामुळे खरडून गेलेल्या जमिनींचे पंचनामे अचूक होणे गरजेचे असून खरडून गेलेल्या क्षेत्राला प्रत्यक्ष भेट देवून संयुक्त पंचनामे पूर्ण करावेत, अशा सूचना महसूल राज्यमंत्री योगेश कदम यांनी दिल्या. लातूर शासकीय विश्रामगृह येथे गुरुवारी झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, मंजुषा लटपटे, शरद झाडके, अविनाश कोरडे, सुशांत शिंदे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शिवसांब लाडके यांच्यासह विविध शासकीय यंत्रणांचे अधिकारी, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक, पीक विमा कंपनीचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.



राज्य शासनाने लातूर जिल्ह्यात ऑगस्टपर्यंत झालेल्या नुकसानीकरिता २४४ कोटी रुपयांची मदत दिली आहे. मदतीची रक्कम येत्या १५ दिवसांत शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करावी. नुकसानीची मदत केली जाणारे बँक खाते कोणत्याही कारणाने होल्डवर ठेवले जाणार नाही, याची खबरदारी बँकांनी घ्यावी, असे महसूल राज्यमंत्री श्री. कदम यावेळी म्हणाले. ऑगस्टपर्यंत झालेल्या नुकसानीची मदत वितरीत करण्यात आली असली तरी सप्टेंबरमध्ये झालेल्या पावसामुळे पिकांचे आणखी वाढीव नुकसान झाले आहे. त्यामुळे या वाढीव नुकसानीचे पंचनामे करून किती प्रमाणात नुकसान झाले आहे, याची नोंद घ्यावी. नुकसानीचे पंचनामे, सर्वेक्षण करताना संबंधित अधिकारी, कर्मचारी यांनी फिल्डवर जावून काम करावे. कोणताही नुकसानग्रस्त शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या. पुराच्या पाण्यामुळे जिल्ह्यात काही ठिकाणी जनावरांचा चारा वाहून गेला आहे. त्यामुळे जनावरांना चारा उपलब्ध करून देण्याची आवश्यकता आहे. पशुसंवर्धन विभागाने तातडीने आवश्यक चाऱ्याची माहिती घेवून त्याबाबतचा प्रस्ताव पाठवावा, असे राज्यमंत्री श्री. कदम म्हणाले. पुरामुळे नदीकाठच्या गावांमधील विद्युत रोहित्र, विद्युत वाहिन्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानीचे तातडीने सर्वेक्षण करून मिशन मोडवर दुरुस्ती मोहीम राबवावी. तसेच नादुरुस्त रस्ते, पूल, शिवरस्ते दुरुस्तीसाठीही मोहीम हाती घ्यावी. तसेच पीक विमा भरलेल्या शेतकऱ्यांना पीक कापणी प्रयोगाच्या निकषावर पीक विमा भरपाई मिळणार आहे. त्यामुळे पीक कापणी प्रयोग अधिक अचूक होतील, याची संबंधित विभागांनी दक्षता घ्यावी, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

## आरोग्य शिबीरातुन गरजु रुग्णांना नवसंजिवनी मिळते : माजी मंत्री आ.संजय बनसोडे

उदगीर : आपल्या घरची स्त्री ही कुटुंबाचा आधार असून, समाजात तिचे आरोग्य आणि सवयी भावी पिढीसाठी महत्त्वाच्या ठरतात.भारतीय समाजात स्त्रियांना विविध रुपात बघितले जाते. आज स्त्रीयांच्याही जीवनात शिक्षण आणि सक्षमीकरणामुळे त्यांच्यात बदल घडत आहेत आणि त्यांना अधिक संधी मिळत आहेत.आपल्या कुटूंबात स्त्रीची भूमिका आणि महत्त्वाची असते तिच्या आरोग्याची काळजी आपणच घेतली पाहिजे कारण आपल्या घरातील स्त्री निरोगी तर कुटुंब निरोगी असते सामान्य रुग्णालयाने आयोजीत केलेल्या स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियानातुन गरजु रुग्णांना नवसंजिवनी मिळत असल्याचे मत माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांनी व्यक्त केले. ते उदगीर शहरातील सामान्य रुग्णालयात आयोजीत स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियान व सर्व रोग निदान' कार्यक्रमाप्रसंगी बोलत होते. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.प्रदीप ढेले, वैद्यकिय अधिक्षक डॉ.पी.के. दोडके, डॉ.दत्तात्रय पवार, डॉ.अशोक सारडा, डॉ.मोनिका पाटील, प्रा.श्याम डावळे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष बालाजी भोसले, शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ, युवक तालुकाध्यक्ष गिरीष उप्परबावडे, धनाजी मुळे, बाळासाहेब पाटोदे, चंद्रकांत टेंगटोल, अभिजीत औटे, सतिश पाटील, उर्मिला वाघमारे, डॉ.दिपक लांडे, डॉ. संजय भोसले, डॉ.प्राची हरिदास, डॉ.अजय महिंद्रकर, डॉ.विद्या गुरुडे, डॉ.मेघश्याम कुलकर्णी, डॉ.प्रीती बादाडे, डॉ.धिरज देशमुख, डॉ.बळीराम सोनवणे, डॉ.सईद शेख, डॉ.बस्वराज स्वामी, सचिन पंडित आदी उपस्थित होते पुढे बोलताना आ.संजय बनसोडे यांनी, उदगीर शहरातील



सामान्य रुग्णालय हे सामान्य रुग्णांना सेवा देण्यासाठी उभारण्यात आले असुन या ठिकाणी सर्व वैद्यकिय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपले कर्तव्य बजावून रुग्णांना वेळेवर सेवा देण्याच्या सुचना दिल्या. रुग्णालयातील परिस्थितीचा आढावा घेवुन या ठिकाणच्या उपलब्ध सुविधा व औषधाचा पुरवठा, कर्मचारी व डॉक्टर यांची रिक्त पदे यांचा आढावा घेवुन या सामान्य रुग्णालयाला सर्व सोई - सुविधा पुरवणार असल्याचेही आ.बनसोडे यांनी सांगितले. सामान्य रुग्णालयात आलेला रुग्ण योग्य उपचार घेवुन वेळेत बरा व्हावा यासाठी येथील वैद्यकिय कर्मचाऱ्यांनी मेहनत घ्यावी. लातूर जिल्ह्यातील सर्वात मोठे शहर म्हणून उदगीरची ओळख आहे. त्यामानाने आपल्या सामान्य रुग्णालयात दररोज ओपीडींची संख्या मोठी असून भविष्यात रुग्णांची गरज लक्षात घेऊन रुग्णालयाचा विस्तार करण्यासाठी मी प्रयत्नशील असल्याचे आमदार संजय बनसोडे यांनी सांगितले. यावेळी सामान्य रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी, डॉक्टर्स, नर्स, नागरीक व कर्मचारी उपस्थित होते.

## अतिवृष्टीने बाधीत शेतक-यांसाठी एक दिवसीय विशेष अधिवेशन बोलवा प्रदेश कॉंग्रेस प्रवक्ते धिरज देशमुख यांची सरकारकडे मागणी

लातूर :-- सध्या अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीमुळे शेतकरी हवालदिल झाला असून अशा अडचणीच्या काळात राज्यसरकारने नुकसानग्रस्त शेतक-यांचे हित डोळ्यासमोर ठेवून सकारात्मक दृष्टीकोन बाळगून एक दिवसीय विशेष अधिवेशन बोलवावे अशी मागणी प्रदेश कॉंग्रेसचे प्रवक्ते, जिल्हा बँकेचे अध्यक्ष माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी सरकारकडे मागणी केली आहे.



दि. २६ सप्टेंबर २०२५ रोजी लातूर ग्रामीण मधील जेवळी, टाकळी ब. नागझरी,रेणापुर तालूक्यातील आरजखेडा, दर्जीबोरगाव, ब्रम्हवाडी येथील अतिवृष्टीमुळे बाधीत क्षेत्राची पाहणी करून प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी ही मागणी केली. अडचणीच्या या काळात आम्ही खंबीरपणे शेतक-यांसोबत असून जो पर्यंत शेतक-यांना सरकार कडून आर्थिक मदत मिळत नाही तोपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाहीत असे सांगितले. अतिवृष्टीमुळे ग्रामीण भागात झालेले नुकसान हे अतोनात असून सरकारने याकडे सकारात्मक दृष्टीने पहायला हवे. सोयाबीन, ऊस, फळबागा व अन्य पिके यासोबतच पशुधनाचे झालेले नुकसान हे अतोनात असून सरकारने या परिस्थितीकडे सकारात्मक दृष्टीने पहायला हवे. सरकारला खरंच शेतक-यां विषयी आस्था असेल तर मराठवाड्यात मदती संदर्भात मंत्रीमंडळाची बैठक घेवून वेळप्रसंगी एक दिवसाचे विशेष अधिवेशन घ्यायला हवे अशी देखील मागणी त्यांनी केली. दसरा व दीपावलीचा सण कांही दिवसांवर आला असून हे सण कसे साजरे करावेत हा मोठा प्रश्न शेतक-यांपुढे निर्माण झाला आहे. त्यामुळे सरकारने निकषांची बाब बाजूला ठेवून सरसकट भरीव आर्थिक मदत व कर्जमाफी जाहीर करून आपले दायित्व पारपाडायला हवे असे माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी सांगितले.


दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

# संपादकीय

## मान्सूनच्या लहरीपणामुळे शेती संकटात!

गेल्या दशकभरात भारतातील मान्सून पॅटर्नमध्ये लक्षणीय बदल झाला आहे. आगमनातील अनियमितता, पावसात पडणारे खंड, कमी कालावधीत अतिप्रमाणात पडणारा पाऊस या सर्वांमुळे देशातील शेती क्षेत्राला प्रचंड फटका बसतोय. अनियंत्रित जागतिक तापमानवाढ आणि हवामान बदलांच्या वाढत्या तीव्रतेमुळे येणार्या काळात मान्सूनचा लहरीपणा वाढत जाणार आहे. अशा वेळी पीक पद्धतीमध्ये बदल करणे अपरिहार्य ठरणार आहे. या आव्हानांना शेतकरी, संशोधक आणि धोरणकर्ते यांनी एकत्र येऊन दीर्घकालीन दृष्टीने बदल करावे लागतील.

रंगनाथ कोकणे, पर्यावरण अभ्यासक भारतातील एकूण पावसापैकी सुमारे ७५ टक्के पाऊस हा नैऋत्य (दक्षिण–पश्चिम) मान्सूनकडून मिळतो. त्यामुळे शेती, अर्थव्यवस्था आणि जलसुरक्षा या क्षेत्रांसाठी मान्सून हा महत्त्वाचा मानला जातो. विशेषतः भारतातील जवळपास अर्धी शेती ही पावसावर अवलंबून असल्यामुळे मान्सूनची सुरुवात कधी होते आणि तो कशा प्रकारे पुढे सरकतो, हे ठरवणारे ठरते. मान्सून वेळेआधी किंवा उशिरा आल्यास पिकांचे उत्पन्न मोठ्या प्रमाणावर प्रभावित होते. २०२५ मध्ये मान्सून नेहमीच्या एक जूनऐवजी केरळमध्ये २४ मे रोजी म्हणजे सुमारे आठ दिवस आधी दाखल झाला. २००९ नंतरचा हा सर्वात लवकर दाखल झालेला मान्सून मानला जातो. मात्र जूनच्या सुरुवातीला तो खंडित टप्प्यात गेला आणि उत्तर भारतात उष्णतेच्या लाटेचा इशाराही जारी झाला. मान्सून वेळेआधी सुरू होणे म्हणजे काय, याचा नेमका अर्थ काय? यावर्षी जरी हंगामी पावसाचे प्रमाण सामान्यपेक्षा जास्त असेल, असे अंदाज व्यक्त केले गेले असले तरी पावसाचे भौगोलिक वितरण आणि त्याचे कालावधीतील सातत्य यावर परिणाम किती होतो हे तपासणे आवश्यक ठरते. भारतीय हवामान खात्याच्या मागील २० वर्षांच्या आकडेवारीनुसार मान्सूनचे आगमन, पावसाचे एकूण प्रमाण, तसेच परतीच्या तारखा यांचे परस्परसंबंध अभ्यासले आहेत. हवामानबदलाच्या वेगवान काळात या बदलांचा अभ्यास करणे देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी, शेतीसाठी, पाणी व्यवस्थापनासाठी आणि आपत्ती व्यवस्थापनासाठी महत्त्वाचे ठरते. भारतात मान्सूनच्या आगमनाची अधिकृत घोषणा केरळच्या किनार्यावर त्याच्या दाखल होण्याने केली जाते. मात्र हे केवळ पहिल्या सरींवर आधारित नसते. भारतीय हवामान विभाग विशिष्ट वैज्ञानिक निकष पाळूनच मान्सून सुरू झाल्याचे जाहीर करतो. १० मे नंतर मिनिकॉय, अमिनी, तिरुअनंतपुरम, पुणालूर, कोल्लम, अलप्पुझा, कोट्टायम, कोची, त्रिशूर, कोझिकोड, थलसेरी, कन्नूर, कुड्लू आणि मंगळूर या १४ केंद्रांपैकी किमान ६० टक्के केंद्रांवर सलग दोन दिवस २.५ मि.मी. किंवा त्यापेक्षा जास्त पाऊस झाल्यास आणि त्यासोबत ढगाळ वातावरण, वार्यांचे स्वरूप यांसारख्या इतर अटी पूर्ण झाल्यासच केरळमध्ये मान्सून दाखल झाल्याचे घोषित केले जाते. त्यानंतर मान्सून टप्प्याटप्प्याने उत्तरेकडे सरकत काही आठवड्यांत संपूर्ण देश व्यापतो.

२००५ ते २०२५ या २० वर्षांच्या काळात ११ वेळा मान्सून वेळेआधी आला असून गेल्या पाच वर्षांत तर हे प्रमाण अधिक प्रकर्षाने दिसून आले आहे. सर्वात लवकर आगमन २००९ मध्ये २३ मे रोजी झाले होते, तर २०२५ मध्ये २४ मे हा त्यानंतरचा सर्वात लवकर आलेला दिवस आहे. या २० वर्षांपैकी ८ वर्षांत मान्सून उशिरा दाखल झाला. अभ्यासातून दिसते की, मान्सूनचे लवकर आगमन झाले म्हणजे संपूर्ण हंगामात पाऊस जास्त पडेलच असे नाही; मात्र जून महिन्यातील पावसाच्या शेती क्षेत्रावर त्याचे गंभीर परिणाम दिसतात. उदाहरणार्थ, २०२५ मध्ये महाराष्ट्रात वेळेआधी पावसामुळे काही पिकांचे नुकसान झाले. दुसरीकडे तांदूळ, कापूस यांसारख्या खरीप पिकांची पेरणी मात्र वेळेआधी सुरू झाली. २०२५ मध्ये मान्सून लवकर येण्यामागे अनेक मोठ्या हवामान प्रणाली आणि समुद्रसंबंधी प्रक्रिया कारणीभूत ठरल्याचे मानले जाते. मॅडन–ज्युलियन ऑस्सिलेशन हा पूर्वेकडे सरकणारा ढग–वादळांचा पट्टा मेच्या अखेरीस भारताजवळ सक्रिय होता. त्यामुळे अरबी समुद्र व बंगालच्या उपसागरात ढगांची निर्मिती होऊन मान्सून पुढे सरकण्यास मदत झाली. २४ मे रोजी अरब सागरावर कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले होते, ज्यामुळे ओलसर वारे खेचले गेले व मान्सूनला चालना मिळाली.

पावसाच्या या बदलत्या पॅटर्नमुळे भारताने मान्सूनसाठी तयारी करण्याची पद्धत बदलणे आवश्यक झाले आहे. खरीप पिकांच्या वेळेआधी पेरणीला चालना मिळाली तरी नियोजन लवचिक नसेल तर नुकसानही होऊ शकते. भारतीय हवामान विभागाने मे महिन्यात भारत फोरकास्ट सिस्टीम सुरू केले आहे. यामुळे पंचायती पातळीपर्यंत सहा किलोमीटरच्या रिझोल्यूशनमध्ये स्थानिक अंदाज मिळू शकतात. मात्र केवळ माहिती पुरेशी ठरणार नाही; पिकांच्या वेळापत्रकात बदल करणे, हवामान अंदाज शेती व शहरी नियोजनात समाकलित करणे, स्थानिक संस्थांची क्षमता वाढवणे या उपाययोजना आवश्यक आहेत.

भारताची अर्थव्यवस्था अजूनही मान्सूनवर अवलंबून आहे. हवामानबदलाच्या वेगवान युगात मान्सूनच्या बदलत्या रूपाचे आकलन, त्याचे अचूक भाकीत आणि त्यानुसार नियोजन करणे हीच खरी हवामान प्रतिकारशक्ती ठरणार आहे. आता नेहमीच्या पद्धतीने जगणे भारताला परवडणारे राहिलेले नाही. या बदलातून पुढील काळात शेतीचे पॅटर्न बदलणे अपरिहार्य ठरेल. आपण शेतीचे संरचनात्मक बदल लवकर केले नाहीत तर या बदलांचे दुष्परिणाम फक्त उत्पादनावरच नव्हे तर अन्न सुरक्षिततेवर, ग्रामीण अर्थव्यवस्थेवर आणि सामाजिक स्थैर्यावरही मोठ्या प्रमाणावर होतील. महाराष्ट्रासारख्या राज्यात मान्सूनचे वितरण आणि वेळापत्रक बदलत असल्याने पारंपरिक पीकचक्र ज्यावर शेतकरी दशकानुदशके अवलंबून राहिलेले होते ते आता टिकाव धरू शकत नाहीत.

असे असताना आपल्याकडे आजही पारंपरिकरीत्या एका वर्षात एकाच पिकावर किंवा मर्यादित काही नगदी पिकांवर अवलंबून राहण्याची पद्धत अबाधित आहे. परंतु आता शाश्वत शेतीसाठी विविधीकरण अनिवार्य आहे. कृषी संशोधन संस्थांनी आणि राज्यस्तरीय प्रयोगांनी दाखवून दिले आहे की, काही प्रदेशांमध्ये बियाणे बदलून उष्ण–सहनशील व पाऊस–सहनशील वाणांचा उपयोग, फळबाग व पशुसंवर्धनाचा समावेश केल्यास शेतकर्यांचे धोके कमी होऊ शकतात. कृषी संशोधन संस्था यांनी महाराष्ट्रासाठी क्लायमेट–रेझिलिएंट तंत्रज्ञान, जलसंधारणाच्या पद्धती आणि स्थानिक पिकांचे बदल यावर शिफारशी जाहीर केल्या आहेत.

# सापडला तोच चोर .. ..!

✻ महाराष्ट्रातील दारूबंदी कायदा– मुंबई दारूबंदी अधिनियम १९४९ हा कायदा मुंबई राज्यात दारूबंदीचा प्रचार आणि अंमलबजावणी करण्यासाठी लागू करण्यात आला होता. ✻ उद्दिष्टे : – या कायद्याचा उद्देश दारूचे उत्पादन , वितरण, विक्री आणि सेवन यावर नियंत्रण ठेवणे आहे.✻ परवाना प्रणाली :– मद्य खरेदी, बाळगणे, सेवन करणे किंवा इतरांना देणे या सारख्या कृतीसाठी या कायद्यानुसार परवाना आवश्यक आहे. ✻ राज्य शासनाचा अधिकारी :– भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ४७ नुसार , राज्य सरकार आरोग्यासाठी हानिकारक असलेल्या मादक पेयांच्या सेवनावर बंदी आणण्यासाठी प्रयत्न करते.

✻ या कायद्याचे मुख्य पैलू :– हा कायदा सार्वजनिक शांतता राखण्यासाठी आणि दारूमुळे होणाऱ्या सामाजिक दुष्परिणामांना प्रतिबंध घालण्यासाठी बनवला गेला आहे. ✻ दारूशी संबंधित गुन्हे रोखण्यासाठी आणि व्यक्तींना मद्य सेवन करण्यापासून परावृत करण्यासाठी या कायद्यात तरतुदी आहेत. ✻ राज्याच्या धोरणांना अनुरूप दारूबंदीचे धोरण राबविणे ही या कायद्याचे उद्दिष्ट आहे. वरील प्रमाणे आपल्या राज्यात दारू बंदीचा कायदा अमलात असला तरी सुद्धा बऱ्याच ठिकाणी त्याचे उल्लंघन होत असते त्यामुळेच पोलिसांना या कायद्याची अंमलबजावणी करीत असताना विविध ठिकाणी अचानक सापळे तयार करून विना परवाना वाहतूक करणाऱ्या पकडावे लागत असते.

आज दिनांक २६ सप्टेंबर २०२५ रोजी आपल्या पुणे जिल्ह्यातील बातमी वाचनात आली ती अशी ✻ विनापरवाना देशी – विदेशी दारू वहातूक करणारे दोघे जेरबंद. ✻ वडगाव निंबाळकर पोलिसांची कारवाई. ✻ पिकअपसह ११ हजार ३७५ रुपयांचा मुद्देमाल जप्त. निंबुत : अवैध देशी विदेशी दारूची वहातूक करणाऱ्या दोघांना वडगाव निंबाळकर पोलिसांनी गुन्हा दाखल करून अटक केली. शुभम रामचंद्र होळकर ( रावडी खुर्द ता. फलटण जिल्हा सातारा ) आणि सोमनाथ बाळासो पवार ( रा. करंजेपूल ता.बारामती जिल्हा पुणे ) अशी अटक केलेल्या दोघांची नावे आहेत. पिकअपसह ११ लाख ११ हजार ३७५ रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.

नीरा– बारामती मार्गावर निंबुत तालुका बारामती येथे विनापरवाना देशी– विदेशी दारूची वाहतूक करणारा पिकअप येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी घटनास्थळावर धाव घेत वाहनांची तपासणी सुरू केली. त्यावेळी संशयित पिकअप हात करून थांबून पाहणी केली. त्यावेळी पिकअपमध्ये विनापरवाना बेकायदेशीर देशी–विदेशी दारूचे बॉक्स मिळून आले. शुभम रामचंद्र होळकर आणि सोमनाथ बाळासाहेब पवार (रा.करंजेपूल तालुका बारामती जिल्हा पुणे ) यांना गाडीतील मुद्देमालाबाबत वाहन परवाना मुद्देमालांची कागदपत्रे, मुद्देमाल कोठून आणला व कोठे नेत आहे.

या बाबत विचारणा केली असता उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यामुळे पिकअपसह मुद्देमाल जप्त करून वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशनमध्ये महाराष्ट्र दारुबंदी कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोलिस हवालदार कुंडलीक कडवळे हे करीत आहेत. पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल ,अप्पर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार , उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक नागनाथ पाटील , पोलीस हवालदार कुंडलीक कडवळे ,पोलीस नाईक भाऊसाहेब मारकड, आबा जाधव , सुरेश धोत्रे , विलास ओमासे व गृहरक्षक दल यांच्या पथकाने ही कारवाई केली.

अशा प्रकारच्या घटना केवळ पुणे जिल्ह्यातच घडत नाहीत , तर आजच कोल्हापूर जिल्ह्यातील बातमी वाचनात आली. ती अशी की , विना परवाना वाहतूक होणारी चार लाखांची दारू जप्त. एलसीबी पथकाचा आंबेवाडी जवळ सापळा ; वाहनासह १२ लाखांचा मुद्देमाल जप्त. दोघांना अटक. हॉटेलला दारूचा पुरवठा .जप्त केलेली दारू ही संशयित विशाल कांबळे व युवराज पाटील या दोघांनी लक्ष्मीपुरी येथील रोहित वाईन्समधून खरेदी केली होती. ती बांबवडे (तालुका शाहूवाडी ) येथील एका हॉटेलमध्ये पोहोच केली जाणार होती. मात्र दारू ने–आण करण्याचा कोणताही परवाना संबंधितांकडे नसल्या मुळेच पोलिसांनी सापळा रचून ती जप्त केली.

कोल्हापूर : देशी व विदेशी दारू वाहतूक करण्याचा कोणताही परवाना नसतानाही दारू घेऊन जाणारा टेम्पो पकडून एलसीबीच्या पथकाने कारवाई केली. यावेळी वेगवेगळ्या कंपनीची चार लाखांची दारू व वाहन असा १२ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी विशाल रमेश कांबळे (वय वर्षे ३० रा. वाकरे तालुका करवीर ) ,युवराज महादेव पाटील वय वर्षे ४५ म्हणून ननूद्रे तालुका पन्हाळा ) या दोघांना अटक केली आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील अवैद्य व्यवसायाचे समूळ उच्चाटन करण्याबाबत पोलिस अधीक्षक योगेशकुमार गुप्ता यांनी सर्वच प्रभारी अधिकाऱ्यांना आदेश दिले आहेत . त्यानुसार कारवाईचा सपाटाच लावला आहे.

स्थानिक गुन्हे अन्वेषण चे पोलीस निरीक्षक रवींद्र कळमकर यांनी पथक नेमले आहे. या पथकातील अंमलदार अनिकेत मोरे, योगेश गोसावी, सचिन जाधव, यांना गोपनीय सुत्राकडून माहिती मिळाली की , एक टेम्पो कोल्हापूर ते आंबेवाडी रोडने विनापरवाना दारूची वाहतूक करणार आहे. मंगळवारी रात्री पथकाने सापळा रचून हा टेम्पो जप्त केला. या वाहनात वेगवेगळ्या कंपनीचे देशी–विदेशी दारूचे बॉक्स होते. तब्बल ३ लाख ८३ हजार रुपयांचा दारूसाठा व वाहन असा १२ लाखांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.

या कारवाईत उपनिरीक्षक जालिंदर जाधव, संतोष गळवे, वैभव पाटील, समीर कांबळे , विशाल चौगले, प्रदीप पाटील , विनायक चौगले, अमित मर्दाने ,वसंत पिंगळे ,गजानन गुरव ,राजू कोरे, विजय इंगळे यांनी सहभाग घेतला. अशा प्रकारच्या घटना संपूर्ण राज्यभर घडत आहेत पोलिसांचा डोळा चुकवून ह्या घटना घडत असतात. कारण आपला समाजच दारूच्या आहारी गेलेला असल्यामुळे वाम मार्गाने दारूची वाहतूक चालूच असते. त्यामुळे खेदाने म्हणावे वाटते सापडला तोच चोर .. ..! अशीच अवस्था आहे.

********

लेखक
जी.एस.कुचेकर पाटील
भुईंज तालुका वाई जिल्हा सातारा
मो.न. ७५८८५६०७६१

# सामाजिक,सांस्कृतिक व आर्थिक विकासाचा आधारस्तंभ.

जागतिक संतुलन टिकवीण्यासाठी आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी सर्वच देशांनी पर्यटनाला जास्त महत्त्व दिले पाहिजे.जगातील देशांना आर्थिकस्थिती बळकट करण्यासाठी पर्यटनाला चालना देण्याची नितांत गरज आहे.पर्यटनाचे महत्व आणि लोकप्रियता पाहून संयुक्त राष्ट्रसंघाने १९८० पासुन २७ सप्टेंबर विश्र्व पर्यटन दिवस साजरा करण्याची घोषणा करण्यात आली. कारण संयुक्त राष्ट्र संघाने २७ सप्टेंबर १९७० ला विश्व पर्यटन संघटनेचा संविधान स्वीकारला होता. जिवनामध्ये खुशी निर्माण व्हावी याकरिता पर्यटनस्थळांना भेट देने गरजेचे असते. पर्यटन फक्त जीवनात खुशीच निर्माण करत नाही तर सामाजिक, सांस्कृतिक, राजनैतिक आणि आर्थिक विकासामध्ये महत्त्वाची भूमिका बजावुन बळकट करण्याचे काम करीत असते.आज अनेक देशांची अर्थव्यवस्था पर्यटनामुळे मजबूत झाल्याचे दिसून येते.भारत पर्यटनासाठी व पर्यटकांसाठी स्वर्ग तर विश्र्व शांतीचा दुत आहे.पर्यटन हे जागतिक प्रदुषण नियंत्रणाचे सुध्दा महत्वाचे काम करीत असते.त्यामुळे पर्यटनावर जेवढा जास्त भर दील्या जाईल तेवढेच प्रदुषण कमी होईल व मानवजातीसह, जीवजंतू, वन्यप्राणी, जंगल संपदा यांना जीवदान व दिलासा मिळेल. त्यामुळे पर्यटनाला जास्त महत्व देण्याची गरज आहे.भारतात २८ राज्ये व ८ केंद्र शासीत प्रदेश आहेत. प्रत्येक राज्यात आपल्याला मोठ्या प्रमाणात पर्यटन स्थळे पहायला मिळतात. आजही लाखो विदेशी पर्यटक भारतात येतात व पर्यटनाचा आनंद घेतांना दिसतात. पर्यटस्थळे देशाला सुशोभित करतात व देशाच्या विकासाला हातभार लावण्याचे व चालना देण्याचे काम पर्यटनाच्या माध्यमातून नेहमी होत असते.भारतात लाखोंच्या संख्येने विदेशी पर्यटक नेहमी येत असतात. कारण जगाच्या पाठीवर भारतातील पर्यटनस्थळे ऐतिहासिक, पुरातन,नामांकित व सुशोभित आहे.यामुळे भारताला विदेशी चलन मोठ्या प्रमाणात प्राप्त होते. भारतातील पर्यटनामुळे विदेशी पर्यटकांचे मन मोहून जाते. भारतातील पर्यटकसुध्दा अनेक रम्य ठिकानांणा भेट देऊन आपली उपस्थिती नोंदवीतात. पर्यटनाला चालना मिळावी व रोजगार मिळावा या उद्देशाने २०१९ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरून भाषण देताना घोषणा केली की देशातील प्रत्येक नागरिकांनी दरवर्षी १० पर्यटन स्थळांना भेट देऊन भारताचा सन्मान वाढवावा.भारतातील राजे–महाराजे यांचे साहित्य, किल्ले, काश्मिरसारखी पर्यटनस्थळे,देवी–देवतांची नामांकित स्थळे,ताजमहल, कुतुबमिनार,बुध्दगया सारखी अनेक ऐतिहासिक स्थळे भारतात आहेत. पर्यटनाला चालना मिळावी म्हणून अमेरिकन भारतीयांनी दरवर्षी पाच अभारतीय कुटुंबाना पर्यटक म्हणून भारतात पाठवावे असे आवाहन ह्युस्टनयेथील हाऊदी मोदीकार्यक्रमात पंतप्रधान मोदी यांनी केले होते.कारण यामुळे पर्यटनाला मोठ्या प्रमाणात चालना मिळेल. जगात अनेक महत्वपूर्ण ठिकाणे आहेत.परंतु काही पर्यटन ठिकाणे निसर्गाचे संतुलन बिघडल्यामुळे दुर्लक्षित होतांना दिसतात.ती वाचविण्यासाठी जगातील प्रत्येक देशांनी पुढाकार घेतला पाहिजे व पर्यटनाला चालना दिली पाहिजे. वाढते प्रदुषण,प्लास्टिकचे दुष्परिणाम, जगातील वाढते तापमान, भुकंप, सुनामी, महाप्रलय, ज्वालामुखीचा उद्रेक,वाढती लोकसंख्या यामुळे पर्यटनस्थळांवर मोठ्या प्रमाणात विपरीत परिणाम होतो व याचा दुष्परिणाम पर्यटकांवर होत असतो. याला कुठेतरी रोखण्याची गरज आहे. याकरिता संपूर्ण जगाने विचार मंथन करण्याची गरज आहे. जगातील वाढत्या तापमानामुळे मोठमोठी ग्लेशीअर वितळत आहे.यामुळे पर्यटनावर,पर्यटकांवर आणि निसर्गावर विपरीत परिणाम होतांना दिसतो.आज भारतातील व जगातील सर्वात मोठे पर्यटनस्थळ म्हणून गुजरात मधील नर्मदा नदीच्या काठावर लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा स्टॅच्यु ऑफ युनिटी भव्य पुतळा उभारण्यात आला आहे.या व्यतिरिक्त भारतात इतकी पर्यटनस्थळे आहेत की त्यांची तुलना करने कठीण आहे.भारतात गडकिल्ले, पुरातन भव्य मंदिरे, अजंठा वेरूळ सारख्या लेण्या, बौध्दगया, कुतुबमिनार,ताजमहाल इत्यादी अनेक ऐतिहासिक ठिकाणे पर्यटनाच्या बाबतीत प्रसीध्द आहे. आज जगाच्या दृष्टीकोणातुन विचार केला तर संपूर्ण भारतच पर्यटन स्थळाचा केंद्र बिंदू आहे.भारतात पर्यटन स्थळी देव–दानव, ऋषि–मुनी, साधु–संत, वेषभुषा, पुजापध्दती, भारतीय संस्कृती, विविध भाषा, थोरमहात्म्यांचा,क्रांतीकारकांचा व विविध धर्माचेआ इतिहास अशा अनेक वेगवेगळ्या पध्दती, मनोरंजनात्मक, साहित्य, पौराणिक कथा, इतिहास व संस्कृतीचे दर्शन भारतातील पर्यटन स्थळी पहायला मिळते व पर्यटकांचे मन मोहून जाते. भारतात अनेक धर्माचे व पंथाचे लोक रहात असल्यामुळे याठिकाणी वेगवेगळ्या पध्दतीची पर्यटनस्थळे भाषा सुध्दा पहायला मिळते.भारतातील खान–पानाच्या पध्दतीचा विदेशी पर्यटक मोठ्या आनंदाने स्वाद घेतात. भारतातील इतिहास आहे की एकट्या महाराष्ट्रात ३१७ गडकिल्ले आहेत यातील फक्त ९६ गडकिल्ले पर्यटनस्थळे आहेत. परंतु आजही २२१ गडकिल्ले पर्यटनाची व पर्यटकांची प्रतिक्षा करीत आहे.यावर महाराष्ट्र सरकारने विचार करून संपूर्ण गडकिल्ले हेरिटेज, लग्नसमारंभ, मनोरंजनात्मक कार्यक्रम याकरिता भाडे तत्वावर देवु नये.यामुळे पर्यटनस्थळांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊ शकते.याला नाकारता येत नाही.सरकारने स्वत:चे पैशे खर्च करून पर्यटनासाठी सुशोभित केले पाहिजे.यातच महाराष्ट्राचा गौरव आहे.यामुळे भारतातील पर्यटनामध्ये महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक लागेल.कारण महाराष्ट्राचा इतिहास अजरामर आहे.भारतात आजही औरंगाबादला (संभाजीनगरला)पर्यटनसिटीम्हणुन संबोधल्या जाते. त्यामुळे पर्यटनाला जास्त महत्त्व देण्याची गरज आहे.कारण यामुळे पर्यटकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण होते.आज संपूर्ण विश्र्वाला पर्यटन वाढविण्यासाठी सामोर येण्याची गरज आहे.यामुळे जगात प्रदुषणमुक्त वातावरण निर्माण होईल,प्रत्येक देशात मित्रता वाढेल, पर्यावरणात सुधारणा होण्यास मदत होईल.या दृष्टीकोनातून २७ सप्टेंबरला संपूर्ण जगाने संकल्पकेला पाहिजे की पर्यटन हेच जनतेला आनंद प्रदान करू शकते.विश्वातीव देशांनी पर्यटनाकडे जातीने लक्ष दिले तर प्रत्येक देशाची अर्थव्यवस्था सुदृढ आणि बळकट होण्यास मदत होईल.त्यामुळे प्रत्येक स्तरातुन पर्यटनाला चालना मिळायलाच पाहिजे. पर्यटनामुळे सामाजिक, सांस्कृतिक, राजनैतिक व आर्थिकदृष्ट्या मोठ्या प्रमाणात चालना मिळते. पर्यटनामुळे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर मित्रत्वाची भावना वाढते.परंतु जानेवारी २०२० पासुन चिनीचांडालांनी पर्यटनाला व पर्यटकांना ग्रहण लावल्याचे आपण पहाले.अतीथी देव भव म्हणजे पाहुण्यांचा सन्मान करने.परंतु चीनने संपूर्ण जगाच्या पर्यटनावर व पर्यटकांवर पाणी फेरल्याचे दिसून आले.त्यामुळे आज संपूर्ण जगासाठी चीन विषेला साप झाला आहे.जगात अनेक देशांमध्ये मोठ–मोठी पर्यटन स्थळे आहेत.युक्रेन पर्यटनाच्या बाबतीत व महिलांच्या सुंदरतेचे बाबतीत प्रसिद्ध आहे. परंतु गेल्या तीन वर्षांपासून युक्रेन–रशिया युद्धामुळे युक्रेन सध्याच्या परिस्थितीत स्मशानभूमी बनल्याचे दिसून येते.त्याचप्रमाणे चीनने श्रीलंकेला आर्थिकदृष्ट्या कंगाल केले आहे.त्यामुळे श्रीलंकेची आर्थिक परिस्थिती अत्यंत नाजूक आहे. याकरिता सध्याच्या परिस्थितीत श्रीलंका पर्यटनावर जास्त भर देत आहे.कारण जगातील अनेक लोक पर्यटनाच्या दृष्टिकोनातून श्रीलंकेकडे पहातात.कारण श्रीलंकेची आर्थिक बाजू बळकट करण्याचे काम पर्यटनामुळे होत असते.सध्याच्या परिस्थितीत जे–जे देश युध्दामध्ये किंवा गृहयुद्धात जखडले आहेत त्या–त्या देशावर पर्यटनाच्या बाबतीत प्रश्न चिन्ह उपस्थित झालेला आहे.त्यामुळे पर्यटनाला चालना देण्यासाठी संपूर्ण देशांनी शांततेचा मार्ग अवलंबला पाहिजे. मानवजाती, जीवसृष्टी,वन्यप्राणी, पशुपक्षी,स्थल,जल,वायु यांना जीवीत ठेवण्याकरिता व प्रदुषणावर मात करण्यासाठी जगाने पर्यटनाला प्रथम स्थान देवून पर्यटकांचे आकर्षण वाढविण्यासाठी सर्वोतोपरी सहकार्य करण्याची गरज आहे.पर्यटन दिनाचे औचित्य साधून प्रत्येक देशांनी आजच्या दिवशी पर्यटकांच्या हस्ते व सरकारच्या हस्ते मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करायला पाहिजे.यामुळे पर्यटकांमध्ये नवीन आशा–अपेक्षा,आकांक्षा,नवीदिशा निर्माण होईल.भारत सरकारने जागतिक पर्यटन दिवसांच्या निमित्ताने सरकारने, प्रशासनाने आणि सामाजिक संस्थांनी वृक्षलागवडीचा संकल्प घेतला पाहिजे.यामुळे पर्यटनात मोठ्या प्रमाणात भर पडल्याचे दिसून येईल.

*********

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
( स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# गुन्हेगार सत्तेत भागीदार!

असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स या निवडणूक सुधारणा संस्थेच्या अलीकडील अहवालाने या लोकशाही प्रक्रियेतील गंभीर विरोधाभास समोर आणले आहेत आणि ते म्हणजे मंत्र्यांच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीचा आणि प्रचंड संपत्तीचा प्रश्न. असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्सच्या अहवालानुसार, देशातील ६४३ मंत्र्यांपैकी तब्बल ३०२ मंत्र्यांनी त्यांच्या प्रतिज्ञापत्रात कबूल केले आहे की, त्यांच्यावर गुन्हेगारी खटले सुरू आहेत. म्हणजेच सुमारे ४७ टक्के मंत्री आरोपी आहेत किंवा संशयित आरोपी आहेत. ६४३ मंत्र्यांच्या प्रतिज्ञापत्रांचे विश्लेषण केल्यानंतर हे धक्कादायक सत्य समोर आले आहे. यामध्ये ३०२ मंत्र्यांनी स्वतःच त्यांच्या विरोधातील गुन्ह्यांची कबुली दिली आहे. त्यातील १७४ मंत्र्यांवर खूप गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. हे फक्त राज्यस्तरीय मंत्र्यांच्याच बाबतीत नाही, तर केंद्र सरकारच्या ७२ मंत्र्यांपैकी तब्बल २९ मंत्री (४० टक्के) गुन्हेगारी प्रकरणांमध्ये आरोपी आहेत. यापैकी १७४ मंत्र्यांवर तर खून, अपहरण आणि महिलांवरील गंभीर गुन्ह्यांचे आरोप आहेत. ही फक्त आकडेवारी न ठरता आपल्या राज्यकर्त्यांच्या चारित्र्याची केलेली गंभीर शहानिशा आहे. या अहवालात सर्वच प्रमुख पक्षांच्या मंत्र्यांचा समावेश आहे. भाजपच्या ३३६ मंत्र्यांपैकी १३६ (४० टक्के) मंत्री आरोपी आहेत. त्यात ८८ मंत्र्यांवर गंभीर गुन्ह्यांचे आरोप आहेत. काँग्रेसच्या ६१ मंत्र्यांपैकी ४५ (७४ टक्के) मंत्र्यांवर गुन्हे आहेत, त्यात १८ गंभीर प्रकरणे आहेत. टीडीपीचे २३ पैकी तब्बल २२ मंत्री (९६ टक्के) आरोपी असून १३ गंभीर प्रकरणांत अडकले आहेत. द्रमुक, टीएमसी, आप असे कोणतेही पक्ष या आरोपांपासून मुक्त नाही. सदर आकडेवारी पाहता, जणू काही गुन्हेगारी पार्श्वभूमी असणे हेच मंत्रिपदासाठी पात्रतेचे निकष बनले आहेत, असे वाटते. आंध्र प्रदेश, बिहार, महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू, पंजाब यासारख्या ११ राज्यांतील ६० टक्क्यांपेक्षा अधिक मंत्री गुन्हेगारी प्रकरणांमध्ये आरोपी आहेत, ही बाब चिंतेची आहे.



दुसरीकडे, हरियाणा, जम्मू–काश्मीर, नागालँड, उत्तराखंड या छोट्या राज्यांतील मंत्र्यांवर मात्र कोणतेही खटले नाहीत, ही बाब स्वागतार्ह आहे. या अहवालात, अब्जाधीश मंत्र्यांचा उदय होणे ही सर्वात गंभीर बाब मानली पाहिजे. अब्जाधीश होण्यास कारण राजकारण की व्यावसायिक गुंतवणूक हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. या अहवालात आणखी एक धक्कादायक माहिती समोर आली आणि ती म्हणजे मंत्र्यांची वाढत असलेली संपत्ती. देशातील ६४३ मंत्र्यांची एकूण संपत्ती २३,९२९ कोटी रुपये इतकी आहे. म्हणजे सरासरी प्रत्येक मंत्र्याकडे ३७ कोटींपेक्षा अधिक संपत्ती आहे. कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि महाराष्ट्रात अब्जाधीश मंत्र्यांची संख्या अधिक आहे. यातील भाजपचे १४ मंत्री अब्जाधीश आहेत. काँग्रेसचे ११, टीडीपीचे ६ आणि आप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस यांचेही अनेक मंत्री अब्जाधीश आहेत. हे पाहता, राजकारण आता केवळ सेवा क्षेत्र न राहता प्रचंड संपत्ती उभारण्याचे साधन बनले आहे, अशी टीका झाल्यास नवल नाही. एडीआरने काही काळापूर्वी महिला खासदार आणि आमदारांवरील एक अहवाल प्रसिद्ध केला होता. असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्सच्या (एडीआर) दुसर्या अहवालात, महिला खासदार आणि आमदारांविषयी उल्लेख आहे. महिला प्रतिनिधींचाही या गोष्टीत अपवाद नाही. देशातील एकूण ५१२ महिला खासदार आणि आमदारांपैकी १४३ महिलांवर (२८ टक्के) गुन्हेगारी खटले दाखल आहेत. त्यापैकी ७८ महिलांवर (१५ टक्के) खून, अपहरण यांसारखे गंभीर आरोप आहेत. इतकेच नव्हे तर १७ महिला अब्जाधीश असल्याचा दावा त्यांनी प्रतिज्ञापत्रात केला आहे. एडीआरने असेही म्हटले आहे की, ज्या प्रतिज्ञापत्रांच्या आधारे अहवाल तयार करण्यात आला आहे ते २०२० ते २०२५ दरम्यानच्या निवडणुकांदरम्यान दाखल करण्यात आले होते. या प्रकरणांची स्थिती नंतर बदलू शकते; परंतु सद्यस्थितीतील वर्तमान चांगले आहे असे नाही.

कायदा सर्वसामान्यांसाठी एक, पण मंत्र्यांसाठी दुसरा, हे दुर्दैव आहे. निवडणूक आयोगाने उमेदवारांची पारदर्शकता अधिक कडक करावी. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांना निवडणूक लढवण्यास अपात्र ठरवण्यासाठी कायद्यात बदल गरजेचा आहे. जनतेने अशा उमेदवारांना निवडून देताना विचार करणे आवश्यक आहे. एखाद्या सामान्य नागरिकाने गुन्हा केला, तर त्याला पोलीस चौकशीतून कोर्टाच्या सुनावणीपर्यंत संघर्ष करावा लागतो; परंतु एकाच वेळी गुन्हेगार ठरलेले लोक देशाच्या वा राज्याच्या मंत्रिमंडळात मंत्री म्हणून सत्तेवर विराजमान असावेत, हे आपल्या लोकशाहीसाठी मोठे अपयश आहे. एकीकडे केंद्र सरकार प्रस्ताव मांडते की, गंभीर गुन्ह्यांत अडकलेल्या मंत्र्यांना ३० दिवसांत पदावरून हटवले जावे, पण प्रत्यक्षात याची अंमलबजावणी कुठेच होताना दिसत नाही.

एडीआरने देशातील २७ राज्ये, ३ केंद्रशासित प्रदेश आणि केंद्र सरकारमधील एकूण ६४३ मंत्र्यांच्या प्रतिज्ञापत्रांचे विश्लेषण केले आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या लोकांना सत्तेवर बसवणे म्हणजे कायद्याला गालबोट लावणे आहे.

# महसूल विभागातील सर्वात मोठी झाडाझडती; हवेली तालुक्यातील तीन लाचखोर महिला तलाठी एकाच वेळी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात

पुणे, ता. २६ : पश्चिम हवेलीतील सांगरूण,बहुली व खडकवाडी-कुडजे या गावातील तीन महिला तलाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात एकाचवेळी अडकल्या आहेत. हस्तलिखित सातबारा, संगणकीकृत सातबारा व आठ अ उतारा यासाठी शासकीय शुल्काच्या व्यतिरिक्त लाचेची मागणी केल्याचे उघडकीस आले आहे.

एका महिला तलाठ्याला २ हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडले आहे. तिन्ही महिला तलाठ्यांवर खडक पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे हवेली महसूल विभागात एकच खळबळ उडाली आहे.

शारदादेवी पुरूषोत्तम पाटील (वय ४० ,तलाठी खडकवाडी कुडजे, हवेली, पुणे रा.ठि. सर्व्हे न. ५७/१, कृष्णकुंज सोसायटी, मोरे वस्ती, सोलापूर रोड, पुणे मांजरी बुद्रुक ) असे रंगेहाथ लाच स्वीकारलेल्या महिला तलाठ्याचे नाव आहे. प्रेरणा बबन पारधी (वय ३०, तलाठी सांगरूण, हवेली पुणे रा ठि. फ्लॅट न. ७ी, २/४-, जी सोसायटी, गुलमोहर पार्कजवळ, पाषाण, पुणे) व दिपाली दिलीप पासलकर (वय २९ , तलाठी बहुली,हवेली, पुणे रा.ठि. लेन न.४, स्वामी समर्थनगर, कोंढवा, काकडेनगर, पुणे ४८) या दोन महिला तलाठ्यांवर लाचेच्या मागणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी एका ४२ वर्षीय पुरुषाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली होती.



लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार हे जमीन खरेदी विक्रीचा व्यवसाय करतात. त्यांना सांगरून, बहुली, खडकवाडी आणि कुडजे (ता.हवेली) या गावाच्या हद्दीतील जमीन खरेदी विक्री करण्यासाठी पुणे शहराच्या लगतच्या प्रस्तावित रिंग रोड मध्ये अधिग्रहित झालेल्या जमिनीच्या सातबारा तसेच आठ अ उताराचे संगणकीकृत तसेच हस्तलिखित साक्षांकित प्रत हव्या होत्या. त्यासाठी ते सांगरूण येथे कार्यरत असलेल्या तलाठी प्रेरणा पारधी, बहुली येथील तलाठी दिपाली पासलकर व खडकवाडी कुडजे येथील तलाठी शारदा देवी पाटील यांना भेटले.

त्यावेळी सांगरुण गावातील तक्रारदार यांना आवश्यक असलेल्या सातबाराच्या व आठ अ उताऱ्याच्या २४० प्रतीसाठी तलाठी पारधी यांनी सरकारी फी व्यतिरिक्त १६,४०० रुपयाची लाचेची मागणी केली होती.

बहुली गावातील आवश्यक असणाऱ्या सातबाराच्या व उताऱ्याच्या आवश्यक असणाऱ्या १०६ प्रतिसाठी संबंधित गावचे तलाठी दिपाली पासलकर यांनी शासकीय शुल्काच्या व्यतिरिक्त ४ हजार ९१० रुपयांची लाच मागितली होती. खडकवाडी व कुडजे गावातील तलाठी शारदा देवी पाटील यांनी सातबाराच्या व उताऱ्याच्या एकूण ३२ प्रतिसाठी सरकारी शुल्काच्या व्यतिरिक्त १५२० रुपयांच्या लाचेची मागणी तक्रारदार यांच्याकडे केली होती. याप्रकरणी तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली होती.

मिळालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने, १९ सप्टेंबरला पडताळणी केली असता, खडकवाडी कुडजे येथील शारदादेवी पाटील यांना सातबाराच्या व आठ अ उताऱ्याच्या ३२ प्रतिसाठी सरकारी फी रक्कम ४८० रुपये होत असताना, पाटील यांनी तक्रारीपूर्वी तक्रारदाराकडून १ हजार ५००रुपये स्वतः साठी घेतल्याचे कबूल करून आणखी २ हजार रुपयांच्या लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे. शारदादेवी पाटील यांना हवेली तहसीलदार यांच्या कार्यालयासमोरील रस्त्यावर तक्रारदाराकडून दोन हजार रुपयाची लाथ स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले.

सांगरूण गावाच्या प्रेरणा पारधी यांनी सातबाराच्या व उताऱ्याच्या २४० प्रतींसाठी ३ हजार ६०० रुपये होत असताना, तक्रारदार यांच्याकडून तक्रारीपुर्वी ४ हजार रुपये स्विकारून आणखी १२ हजार ४०० रुपयांच्या लाचेची मागणी केल्याचे तपासात उघडकीस आले आहे. बहुली येथील तलाठी दिपाली पासलकर यांच्याकडे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पडताळणी केली असता तक्रारदार यांना १०६ सातबाराच्या व उताऱ्याच्या प्रती पाहिजे होत्या. त्यासाठी सरकारी फी १ हजार ५९० रुपये होत होते. परंतु, त्यांनी पासलकर यांनी तक्रारदाराकडे ६ हजार ५०० होत असून सांगरूण गावाच्या तलाठी प्रेरणा पारधी यांच्याकडे ती रक्कम देण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले आहे.

दरम्यान, तिन्ही आरोपीच्या घरझडतीसाठी पथके तात्काळ रवाना करण्यात आलेले आहेत. घरझडतीची प्रक्रिया सुरु असून या तिघींच्या विरोधात खडक पोलीस ठाण्यात लाचेचा व लाच मागणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पोलीस निरीक्षक शैलजा शिंदे करीत आहेत.

# खामगाव-पंढरपूर महामार्गावरील पुलावर खड्डा पडल्यामुळे प्रवाशांचा जीव धोक्यात

## रात्रीच्या वेळी मोटर सायकल खड्ड्यात पडल्याने अनेक जण जखमी झाले तर एका स्कारपिओ गाडीचे ३८ हजाराचे नुकसान

केज/प्रतिनिधी - केज शहरापासून जवळपास तीन किलोमीटर अंतरावर साने गुरुजी निवासी विद्यालयाच्या नजीक खामगाव-पंढरपूर महामार्गावरील झालेल्या पुलाचे व सिमेंट रस्त्याचे काम हे निकृष्ट दर्जाचे झालेले आहे असे जनसामान्यातून बोलले जात आहे व सदर पुलावर पडलेल्या खड्ड्यावरून दिसून येत आहे. रात्रीच्या वेळी अनेक मोटरसायकल या खड्ड्यात अडकून पडल्याने अनेक जन जखमी झाल्याचे निदर्शनास आले आहे तर मोठ्या प्रमाणात मोटर सायकल सह इतर चार चाकी वाहनांचे नुकसान हि झाले आहे काही मोठ्या गाड्या रात्रीच्या वेळी समोरच्या गाडीच्या लाईटचे डिपर मारल्याने भला मोठा खड्डा न दिसल्याने यामध्ये स्कॉर्पिओ गाडी आदळून ३८ हजार रुपयाचे नुकसान झाले आहे अशी माहिती सदर स्कार्पिओ गाडीचे मालक व चालक जावेद (बाबा) शेख अजय वाघमारे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले आहे. या महामार्गावरील पुलाला पडलेला खड्डा हा गेल्या अनेक महिन्यापासून पडलेला आहे परंतु प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी आणि संबंधित राज्य महामार्गाचे काम करणाऱ्या कंपनीला याचे काही देणे घेणे नसल्याचे प्रवाशातून बोलले जात आहे या महामार्गावरून प्रवास करत असताना काही जीवित हानी झाल्याच्या नंतरच संबंधित विभागाचे अधिकारी व सदर कंपनी खड्डे बुजवणार आहे का असा सवाल प्रवासी वर्गातून व वाहनचालकातून उपस्थित केला जात आहे. सदर महामार्गावरील पुलावर पडलेल्या खड्ड्याची माहिती ही संबंधितांना माहित असून देखील याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे अनेकांचे जीव गेल्यावर संबंधित कार्यालयाचे अधिकारी आणि सदर कंपनी निर्णय घेणार का असा प्रश्न जनसामान्यातून उपस्थित केला जात आहे. सदरील कंपनीचे काम खामगाव ते पंढरपूर काम पुर्ण होत आले असून सदरील काम निकृष्ट दर्जाचे झाल्याने या ठिकाणी जीवित हानी होऊ शकते हेच शहरातील एका सामाजिक कार्यकर्ते अजय वाघमारे व जावेद (बाबा)शेख यांची स्कार्पिओ गाडी रात्री आदळून मोठे नुकसान झाले आहे हे लक्षात आल्याने सकाळी जाऊन या ठिकाणी मोठे झाडाचे फाटे व कपडा बांधून जेणेकरून या ठिकाणी कोणाचीही गाडी जानार नाही याची दक्षता घेऊन जे माझे नुकसान झाले आहे ते इतर कोणाचे होऊ नये म्हणून सतर्कता दाखवत पत्रकार बांधवांना सोबत घेऊन त्यांनी सर्वांच्या निदर्शनास यावे यासाठी तत्परता दाखविली या कार्यासाठी या ड्रायव्हरचे झालेले नुकसान भरपाई कंपनीकडून मिळावे अशी रोडवर ये जा करणाऱ्या प्रवाशाच्या तोंडून ऐकावयास मिळत होते तर रात्रीच्या वेळी धारूर येथील रहिवाशी असलेल्या व केज येते एका खाजगी बँकेत नोकरी करत असलेल्या एका महिलेची याच खड्ड्यात गाडी अडकून पडली होती परंतु सदर महिला हे या घटनेतून बालबाल बचावलेली आहे. पत्रकार वसंत सोनवणे, तात्या गवळी, अजय वाघमारे, जावेद शेख हे या ठिकाणी खड्ड्याच्या बाजूला वाहन चालकाला खड्डा दिसून यावा व या ठिकाणी कोणत्याही प्रकारचा अपघात होऊ नये याकरिता खड्ड्याच्या बाजूने दगडे व झाडांच्या फांद्या टाकून कपडा बांधत असताना सदर महिलेने स्वतःची मोटरसायकल उभी करून रात्री घडलेली घटनेसह व्यथा मांडल्या यावरून असे दिसून येते की, आज पर्यंत या खड्ड्यामुळे अनेक जणांचे नुकसान झाले आहे तरी प्रशासनातील अधिकारी व संबंधित कंपनीचे कर्मचारी यांनी तात्काळ खड्डा बुजवून घ्यावा अशा प्रतिक्रिया माध्यमांशी बोलताना प्रवाशांनी दिल्या आहेत. सदर पुलाचे कॉलम, भिंतीला मोठमोठे तडे जाऊन भेगा पडलेल्या आहेत. सदर पुन्हा प्रवाशांच्या व वाहन चालकांच्या मृत्यूचा सापळा बनला की,काय? असा संतप्त सवाल प्रवाशातून उपस्थित केला जात आहे. जर एखादी दुर्घटना घडली तर याला कोण?जबाबदार राहणार असे अनेक प्रश्न जनसामान्यातून उपस्थित केले जात आहेत. यापुलासह पुलावरील रस्त्यावर पूर्णपणे मोठमोठ्या भेगा पडलेल्या आहेत तर सदर पुलावर पडलेल्या खड्ड्यांमुळे



अनेकांचे जीव धोक्यात आलेले असताना प्रशासनातील अधिकारी आणि संबंधित रस्त्याचे काम करणारी कंपनी ही झोपेचे सोंग घेण्याचे काम करत आहे एकांद्याचा जीव गेल्यावर प्रशासनातील अधिकारी व संबंधित कंपनी जागी होईल का? असे नागरिकातून बोलले जात आहे. सदर पुलावरून प्रवास करत असताना वाहन चालकांनी सावधंता बाळगून प्रवास करावा असे आवाहन जावेद शेख व अजय वाघमारे यांनी केले आहे. पुढे बोलताना म्हणाले की, पुलावरील पडलेल्या खड्ड्याचे आम्ही पाणी केले असता सदर खड्ड्यामध्ये अंदाजे पाच ते सहा फूट लांबीची काटे लांबपर्यंत आत मध्ये जात आहे त्यावरून असे दिसून येते की, सदरचा पुल हा रहदारीसाठी व वाहतुकीसाठी धोकादायक आहे त्याकरिता पंढरपूर-खामगाव महामार्गावर केज शहरापासून जवळपास तीन किलोमीटर अंतरावरील साने गुरुजी निवासी विद्यालयाच्या जवळील पुलावरून प्रवास करत असताना सावधानता बाळगून प्रवास करावा असे आवाहन अजय वाघमारे व जावेद शेख यांनी केले आहे.

# सोनिजवळा येथील मागासवर्गीय स्मशान भूमीवरील अतिक्रमण हटवून मोजणी करा-दीपक कांबळे

केज/प्रतिनिधी -केज तालुक्यातील सोनीजवळा येथील मागासवर्गीय समाजाची स्मशान भूमी वरील लगत स.नं.ची मोजणी करून हद्द कायम करण्याची मागणी रिपाइंचे तालुकाध्यक्ष दीपक कांबळे यांनी निवेदनाद्वारे तहसीलदार केज यांच्याकडे केली आहे. रिपाइंचे तालुकाध्यक्ष दीपक कांबळे,जिल्हा संघटक रवींद्र जोगदंड, गौतम बचुटे, रोहित कांबळे, जोगदंड, पांडुरंग जोगदंड केज यांनी तहसीलदार राकेश गिड्डे यांना निवेदन दिले. त्या निवेदनाद्वारे अशी मागणी करण्यात आली आहे की, सोनीजवळा ता. केज येथील मागासवर्गीय समाजाच्या स्मशान भूमी लगत सर्वे नं.१२२/अ /१ हा पूर्ण सर्वे नं मोजून त्या बांधावर दलित स्मशान भूमी लगत होणारी पायवाट रस्ता त्या सर्वे नं बांधावरून करण्यात यावा. तसेच गावठाण अंतर्गत दलित स्मशान भूमीमध्ये असलेले लुकमान दिलावर शेख, अलीम दिलावर शेख, सुबराव बन्सी जोगदंड यांचे पत्र्याचे शेड व कच्चे घर आणि तसेच समीर सय्यद यांचे प्लॉटिंगचे अतिक्रमण हटवून न्याय देण्यात यावा. या स्मशान भूमीच्या बांधावरील पायवाट रस्ता दि. २१ऑगस्ट २०२५ रोजी मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांनी केलेल्या पंचनाम्या नुसार करण्यात यावा.



# जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेच्या वतीने बालासाहेब जोगदंड व दत्तात्रय जाधव यांचा निरोप समारंभ संपन्न

केज/प्रतिनिधी शहरातील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत दि.२६ सप्टेंबर २०२५ रोजी बदली झालेल्या शिक्षकांचा निरोप समारंभ कार्यक्रम संपन्न झाला. केज शहरातील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेचे सहशिक्षक बालासाहेब जोगदंड सर व दत्तात्रय जाधव सर यांना निरोप देण्यात आला. याकार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मुख्याध्यापक आश्रुबा सोनवणे, तर प्रमुख पाहुणे म्हणून महादेव घोरपडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेच्या वतीने श्री जोगदंड सर व श्री जाधव सर यांचा सपत्नीक शाल, पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. केज शहरातील जिल्हा परिषद केंद्रीय शाळेत सहशिक्षक म्हणून बालासाहेब जोगदंड व दत्तात्रय जाधव हे कार्यरत होते परंतु शासन नियमानुसार बालासाहेब जोगदंड यांची बदली केज तालुक्यातील ढाकेफळ येथे झालेली आहे तर दत्तात्रय जाधव यांची बदली केज तालुक्यातील नायगाव येथे झालेली आहे. या कार्यक्रमा प्रसंगी समद मुल्ला,मुबाशिरोद्दिन इनामदार, हुंबे अर्जून, वंजारे मावशी, इंगळे मावशी तंत्र स्नेही शिक्षिका श्रीमती ढोरमारे मॅडम, श्रीमती इनामदार मॅडम यांच्यासह शिक्षकवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्रीमती गायकवाड मॅडम यांनी केले प्रास्ताविक वाघमारे सर यांनी केले तर उपस्थितांचे आभार ढाकणे सर यांनी मानले.



# बळीराजा पावसाने त्रस्त, कलेक्टर नाचगाण्यात व्यस्त:धाराशिव जिल्ह्यात भयंकर पूरस्थिती असताना जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांचा बेजबाबदारपणा समोर

धाराशिव- मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाने हाहाकार माजवला आहे. धाराशिव, बीड, सोलापूर या भागांत पुराच्या पाण्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतातील पिके वाहून गेली आहेत. जनावरे मृत्युमुखी पडली आहेत. अनेक घरे पाण्याखाली गेल्याने संसार उद्ध्वस्त झाले आहेत. एकीकडे शेतकऱ्यांचा आक्रोश, आंकात सुरू असताना जिल्ह्याची जबाबदारी ज्यांच्या खांद्यावर असते ते जिल्हाधिकारी मात्र नाचगाण्यात दंग झालेत.

जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार आणि निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव यांचा या व्हिडिओमुळे प्रचंड संताप व्यक्त होतोय. जिल्ह्यातला बळीराजा उपाशी आणि प्रशासन तुपाशी अशा भावना व्यक्त केल्या जात आहेत.

मदत कधी मिळणार? धाराशिवच्या जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार आणि निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव यांचा नवरात्र महोत्सवातील डान्सचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. तुळजापुरात नवरात्र उत्सवानिमित्त मंदिर संस्थानकडून सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात दोन्ही वरिष्ठ अधिकारी मंचावर नाचताना दिसत आहेत. पावसाने हवालदिल झालेल्या जनतेला मदत करण्याऐवजी अधिकारी नवरात्र सोहळ्यात रंगलेले दिसल्याने पूरग्रस्तांमध्ये प्रचंड नाराजी आहे. ते मदत कधी मिळणार, असा सवाल करत आहेत.

मदतकार्य अपुरेच्या तक्रारी जिल्हाधिकारी आणि उपजिल्हाधिकाऱ्यांच्या या व्हिडिओनंतर नागरिकांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. पुरात शेतकरी उध्वस्त झाला. गावोगाव जनावरे वाहून जात आहेत. लोक घरदार गमावून रस्त्यावर आले आहेत. अशा गंभीर परिस्थितीत प्रशासनाने लोकांसोबत राहून मदतकार्य करायला हवे होते. मात्र, जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारीच नाचगाण्यात वेळ घालवत असल्याचे पाहून जनतेचा विश्वासच ढळला आहे, असे म्हणत नागरिकांनी प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. विशेष म्हणजे, धाराशिव जिल्ह्यातील अनेक भागात अजूनही बचाव आणि मदतकार्य अपुरे असल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या आहेत.

प्रशासनाची बेफिकिरी खुपणारी पूरस्थितीत प्रशासनाकडून संवेदनशीलता अपेक्षित असते. मात्र, अशा परिस्थितीत वरिष्ठ अधिकारीच सांस्कृतिक कार्यक्रमात नाचताना दिसल्याने प्रशासनाच्या भूमिकेबद्दल शंका उपस्थित होऊ लागल्या आहेत. शेतकरी आणि पूरग्रस्तांना तातडीने मदत पोहोचवून त्यांचे संसार उभे करण्याची गरज असताना प्रशासनाची ही बेफिकिरी नागरिकांच्या डोळ्यात खुपणारी आहे. त्यामुळे आता शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.



पैशाचे सोंग अन् मदत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या दौऱ्यात कर्जमाफीची मागणी करणाऱ्या एका शेतकऱ्याला पैशाचे सोंग आणता येत नाही, असे उत्तर दिले होते. या बद्दलही तीव्र नाराजी व्यक्त झाली. तुम्हाला तात्काळ मदत देता येत नसली, तरी राज्यकर्ते आणि प्रशासनाकडे इतकी भावनाशून्यता येते कुठून, असा प्रश्न अनेकजण विचारत आहेत. तर दुसरीकडे छोट्या-छोट्या सामाजिक संस्था, विविध संघटना, कार्यकर्ते आपल्याला जमेल तशी मदत गोळा करून शेतकऱ्यांपर्यंत पोहचवत आहेत. मदतीसाठी आवाहन करत आहेत. हे शहाणपण प्रशासनाला का सुचत नाही, असा सवालही केला जातोय.

धाराशिवमध्ये प्रभावित गावे आणि पिकांचे नुकसान धाराशिवमध्ये अंदाजे ९२ गावं पुराच्या विळख्यात आली असून, या गावांमधील शेतकऱ्यांचे पिके बऱ्यापैकी वाहून गेले आहेत.

परंडा व भुम तालुक्यातील भाग विशेषतः गंभीर अवस्थेत आहेत.

पाझर तलाव फाटल्याने परिसरात पूरपाणी शिरल्याने जुनी आणि नवी पिकं दोन्ही हानी पोहोचली आहे.

लोकांच्या सुटका आणि बचावकार्ये परंडा तालुक्यात २३९ नागरिकांची सुटका करण्यात आली आहे. एनडीआरएफचे जवान यांनी दोन दिवसांत रात्रंदिवस प्रयत्न केले.

परांडा गावात सलग पावसामुळे अडलेल्या २७ लोकांना हेलिकॉप्टरद्वारे व नावांद्वारे सुटका करण्यात आली.

चिदोरी गावात ७० वर्षांच्या वृद्धेचा मृत्यू झाला आहे. इमारती व घरांची हानी १५९ गावांमध्ये घरं नुकसानग्रस्त ठरली आहेत. त्यापैकी ७६६ घरं आंशिकरीत्या तुटली आहेत आणि ५ झोपड्या पूर्णपणे उद्ध्वस्त झाल्या आहेत.

पूरपाण्याने रस्ते पाण्याखाली गेले आहेत, रस्त्यांचे संपर्क तुटलेले आहे. तेरणा नदीच्या पातळी वाढल्याने गोवर्धनवाडी ते तेर मार्ग पाण्याखाली आल्याने वाहतूक बंद झाली आहे.

# अतिवृष्टीबाधितांच्या मदतीसाठी सरकार बांधील अजित पाटील कव्हेकरांनी नुकसानीची पाहणी करून दिला धीर

लातूर / प्रतिनिधी :- गेल्या काही दिवसांपासून लातूर शहरासह जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली आहे. काही भागात तर विक्रमी पाऊस पडला आहे. या पावसाने लातूर शहरातील काही भागामध्ये पाणी पाणी झाले असून अनेकांच्या घरात पाणी शिरले आहे. यामुळे मोठे नुकसान झाले असून संसारोपयोगी साहित्याची नासाडी झालेली आहे. या अतिवृष्टीबाधितांच्या मदतीसाठी सरकार बांधील असून प्रशासनाकडून तात्काळ या नुकसानीचे पंचनामे करण्यात येतील असा विश्वास देऊन या संकटकाळात पक्ष आणि सरकार आपल्या पाठीशी खंबीर उभे असल्याची ग्वाही भाजपा लातूर शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी दिली आहे.



अतिवृष्टीमुळे लातूर शहरातील सम्राट अशोक नगर, राजीव नगर, प्रबुद्ध नगर, महादेव नगर, संजय नगर, ईस्लामपुरा, प्रताप नगर, म्हाडा कॉलनी, कुष्ठधाम सोसायटी मधील अनेक नागरिकांच्या घरात पाणी शिरून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानीची पाहणी भाजपा लातूर शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांच्याकडून करण्यात आली. यावेळी सरचिटणीस रवी सुडे, मंडल अध्यक्षा निर्मला कांबळे, मधुसूदन पारीख, ललित तोष्णीवाल, प्रमोद गुडे, संजय गिर, दत्ता चेवले, राजकुमार गोजमगुंडे आदि समवेत होते.

लातूर शहरात यावर्षी विक्रमी पाऊस झालेला असून काही भागांत मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झालेली आहे. या अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे तात्काळ करण्याच्या सुचना प्रशासनाला दिल्या असल्याचे सांगून अजित पाटील कव्हेकर यांनी या संकटकाळात नागरिकांनी घाबरू नये असे आवाहन केले. या संकटात नागरिकांच्या पाठीशी सरकार आणि पक्ष खंबीरपणे उभा असून अतिवृष्टीने नुकसान झालेल्यांना मदत देण्यासाठी सरकार बांधील असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली. आगामी काळात याप्रकारची संकटे येऊ नये यासाठी आवश्यक असणाऱ्या उपाययोजना करण्यासाठी शासन व प्रशासनाकडे पाठपुरावा करण्यात येईल असे सांगून यासाठी आवश्यक असणारा निधी उपलब्ध होण्यासाठी आपण स्वतः शासन दरबारी वकिली करू असा शब्द अजित पाटील कव्हेकर यांनी यावेळी दिला.

अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीचे पंचनामे प्रशासनाकडून सुरु झालेले असून ज्या नुकसानग्रस्तांचे पंचनामे झाले नाहीत त्यांनी आपल्याशी संपर्क साधावा असे सांगून सर्व नुकसानग्रस्तांचे पंचनामे करण्यासाठी प्रशासनाला सरकारकडून निर्देश देण्यात आलेले असून या कामात कोणतीही दिरंगाई झाल्यास तात्काळ सांगावे असे आवाहन ही अजित पाटील कव्हेकर यांनी यावेळी केले. या संकटकाळात कोणीही धीर सोडू नये असे सांगून नुकसानग्रस्तांच्या पाठीशी पक्ष आणि सरकार ठामपणे उभे आहे अशी ग्वाही यावेळी भाजपा शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी दिली.

यावेळी काही नागरिकांनी मनपा प्रशासनाकडून आम्हाला अद्यापपर्यंत कबाले देण्यात आलेले नाहीत असे सांगितल्यानंतर यासाठी मनपा प्रशासनाला सूचना करण्यात येईल आणि लवकरात लवकर कबाले देण्यासाठी आवश्यक असणारी कार्यवाही करण्याकरिता पाठपुरावा करण्यात येईल असा विश्वास देण्यात आला. यावेळी मुन्ना हाश्मी, किशोर शिंदे, रत्नमाला घोडके, अनिल सुर्यवंशी, सोनू बनकर, कुमार जाधव, बाळू शिंदे, आकाश खैरमोडे, देवानंद कांबळे आदींसह पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जाती सर्वेक्षणाच्या नावाखाली जनगणना , ; केंद्राच्या युक्तिवादावर कर्नाटक उच्च न्यायालय म्हणाले, तरीही, आम्हाला ते योग्य वाटत नाही

कर्नाटक उच्च न्यायालयाने राज्यात जात-आधारित सर्वेक्षण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चालू सामाजिक आणि शैक्षणिक सर्वेक्षणाला स्थगिती देण्यास नकार दिला आहे. केंद्र सरकारने कर्नाटक उच्च न्यायालयात युक्तिवाद केला होता की ही सर्वेक्षणाच्या नावाखाली केली जाणारी जनगणना आहे आणि ती त्यांच्या अधिकारक्षेत्रावर अतिक्रमण आहे. कर्नाटक उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश विभू बाखरू आणि न्यायमूर्ती सी.एम. जोशी यांच्या खंडपीठाने सर्वे क्षणाच्या वैधतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणाऱ्या अनेक याचिकांवर सुनावणी करताना, त्यावर स्थगिती न देण्याचा अंतरिम आदेश जारी केला. मात्र, न्यायालयाने राज्य मागासवर्गीय आयोगाला गोळा केलेल्या डेटाची गोपनीयता राखून स्वयंसेवी सहभाग सुनिश्चित करण्याचे निर्देश दिले.

कर्नाटक उच्च न्यायालयाने आपल्या आदेशात, चालू सर्वेक्षणाला स्थगिती देणे आम्हाला योग्य वाटत नाही. तथापि, सर्वेक्षणात गोळा केलेला डेटा गोपनीय ठेवला पाहिजे आणि कोणालाही उघड केला जाऊ नये. मागासवर्गीय आयोगाने माहिती पूर्णपणे सुरक्षित आणि गोपनीय ठेवली पाहिजे याची खात्री करावी. असे म्हटले आहे. न्यायालयाने मागासवर्गीय आयोगाला सहभाग ऐच्छिक असल्याचे स्पष्ट करणारी अधिसूचना जारी करण्याचे निर्देश दिले. न्यायालयाने म्हटले आहे की, गणकांनी नागरिकांना सुरुवातीलाच माहिती देण्यास बांधील नसल्याचे कळवावे. आदेशात म्हटले आहे की, जर एखाद्या व्यक्तीने भाग घेण्यास नकार दिला तर गणक त्यांना पटवून देण्याचा किंवा दबाव आणण्याचा कोणताही प्रयत्न करणार नाही. याचिकांमध्ये असा युक्तिवाद करण्यात आला होता की ही प्रक्रिया मूलत: जनगणना आहे आणि गोपनीयतेचे उल्लंघन आहे. राज्याचे प्रतिनिधित्व करणारे महाधिवक्ता शशी किरण शेट्टी यांनी न्यायालयाला आश्वासन दिले की पुरेसे सुरक्षा उपाय आहेत आणि या प्रकरणी प्रतिज्ञापत्र सादर करण्याची ऑफर दिली.

## संजय निलेगांवकर यांची मध्य रेल्वे विभागीय सल्लागार समिती सदस्यपदी नियुक्ती



लातूर : लातूर येथील यशस्वी युवा उद्योजक संजय निलेगांवकर यांची मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागीय सल्लागार समिती सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. संजय निलेगांवकर यांच्यावर यापूर्वी मध्य रेल्वेच्या लातूर स्थानिक सल्लागार समिती सदस्यपदाची जबाबदारी होती. त्यावेळी त्यांनी रेल्वे प्रवाशांच्या समस्या सोडविण्याकामी महत्वपूर्ण योगदान दिले आहे. त्याचप्रमाणे माल वाहतुकीसंदर्भातील समस्या मांडून त्या समस्यांची सोडवणूक यशस्वीपणे करण्याचे काम केले आहे. रेल्वेशी संबंधित समस्या आणि प्रश्नांचा त्यांना चांगला अभ्यास आहे. लातूर लोकसभा मतदार संघाचे खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी निलेगांवकर यांची मध्य रेल्वेच्या मुंबई विभागाचे मुख्य महाव्यवस्थापकांकडे शिफारस केली होती. त्यांच्या शिफारसीनुसार वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक योगेश पाटील यांनी निलेगांवकर यांना नियुक्ती पत्र प्रदान केले आहे. संजय निलेगांवकर यांच्या या नियुक्तीचे खासदार डॉ. शिवाजी काळगे, सहकार महर्षी तथा माजी मंत्री दिलीपराव देशमुख, माजी मंत्री आ. अमित विलासराव देशमुख, माजी आमदार तथा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष धीरज विलासराव देशमुख, अभय साळुंके, ॲड. किरण जाधव, दीपक कोटलवार, उदय चौंडे, उदय पाटील, जगदीश कुलकर्णी, ॲड. संजय पांडे, अशोक गोविंदपूरकर, शिवकुमार क्षीरसागर, प्रसाद उदगीरकर, शिवाप्पा कोरके, हरिराम कुलकर्णी, दगडूआप्पा मिटकरी, लक्ष्मण कांबळे, बाळासाहेब देशपांडे, डॉ. श्रीनिवास संदीकर यांसह अनेक मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

## मायबापानो निराशेचे विचार नको, फक्त एक फोन करा; शेतकऱ्यांना शिवार संसदची भावनिक हाक

लातूर : महाराष्ट्रात पहिल्यांदाच ३१ जिल्ह्यातील १९५ तालुक्यातील ६५४ महसूल मंडळे, ६२ लाख १७ हजार ५४० एकर शेती, २७ लाख शेतकरी अतिवृष्टी व पुराच्या तडाख्याने प्रचंड नुकसान होऊन मोठ्या प्रमाणात जीवित व वित्तहानी झाली आहे. शेतकऱ्यांच्या हाता-तोंडात आलेले सोयाबीन, तूर, कापूस, उडीद ही पिके पूर्ण पाण्यामध्ये बुडून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. मराठवाडा विदर्भ व खानदेश या भागामध्ये प्रामुख्याने या सर्व पावसाचा मोठा तडाका जाणवतोय. करोना संकट, वाढलेली महागाई, पिकांची चिंता, शेतमालाचे पडलेले भाव, आर्थिक चिंता अशा एक ना अनेक परिस्थितीत आपण आतापर्यंत धीराने तोंड दिले आहे, पण शेवटी आताच्या परिस्थितीत त्यातून आलेली हतबलता यामुळे निराश होणे साहजिकच आहे, पण तरीही कृपया मायबापानो कोणतेही टोकाचे पाऊल उचलू नका किंवा निराश होऊ नका. हीसुद्धा वेळ निघून जाईल, आम्ही तुमच्या सोबत आहोत. कोणतीही अडचण असो, आपण त्यातून नक्की मार्ग काढण्याचा प्रयत्न करू, पण हार मानू नका, असं आवाहन शिवार संसदने केले आहे. शिवार हेल्पलाइनद्वारे समुपदेशन, मदत, सल्ला व मार्गदर्शन तात्काळ स्वरूपात करण्यात येईल. आत्ताच्या परिस्थितीनंतरही भविष्यात कधीही कोणत्याही परिस्थितीत मदत लागल्यास फक्त शिवार हेल्पलाइनला ८९५५७७१११५ एक फोन करा, असे आवाहन शिवार फाऊंडेशनचे प्रमुख विनायक हेगाणा यांच्याकडून करण्यात आले आहे. हेल्पलाइन सकाळी ८ ते रात्री ८ पर्यंत मोफत सेवा आहे. यासाठी जिल्हा पातळीवरील कृषी विभाग, जिल्हा प्रशासन, जिल्हा परिषद, जिल्हा पोलीस दल यंत्रणा तसेच राष्ट्रीय सेवा योजना, विशेष सहाय्य घरडा फौंडेशन, मानसिक आरोग्याबाबत मार्गदर्शनासाठी एम.एच.आय या शासकीय, अशासकीय, स्वयंसेवी संस्था सर्वांचे सहकार्य मिळत आहे.

## महाराष्ट्रात ओला दुष्काळ जाहीर करा आणि शेतकऱ्यास सरसकट मदत करा, जिजाऊ ब्रिगेडची मागणी




लातूर :- लातूर जिल्हयासह संपूर्ण महाराष्ट्रात पावसाने शेतीचे अतिशय नुकसान केले आहे, त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे . हाता तोंडाशी आलेला घास निसर्गाच्या प्रकोपाने हिरावून घेतला आहे ,शेतकऱ्यावर आसमानी संकट कोसळले आहे. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात ओला दुष्काळ जाहीर करावा ,अशी मागणी जिजाऊ ब्रिगेडच्या वतीने करण्यात आली आहे. आगामी सणासुदीच्या काळात शेतकरी राजाला मदत म्हणून त्वरित नुकसान भरपाई देण्यात यावी ,अशी मागणी जिजाऊ ब्रिगेडच्या वतीने उपजिल्हाधिकारी मा. संगीता टकले मॅडम यांना निवेदनातून करण्यात आली आहे ,यावेळी जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्षा, अर्चना पाटील, प्रदेश सदस्य रंजना हासुरे ,कोषाध्यक्ष मीरा देशमुख ,उपाध्यक्ष अनिता मुद्गुले, जयश्री हांडे जयश्री सावंत इत्यादी जिजाऊ ब्रिगेडच्या महिला उपस्थित होत्या.

## ओझोन दिनानिमित्त लातूरमध्ये पर्यावरण जनजागृती उपक्रम शाहू महाविद्यालयात पोस्टर सादरीकरण, रांगोळी स्पर्धा व इको क्लबचे उद्घाटन





लातूर /प्रतिनिधी :- लातूर शहर महानगरपालिका आयुक्त श्रीमती मानसी यांच्या संकल्पनेतून व शाहू महाविद्यालय, लातूर यांच्या सहकार्याने ओझोन दिनाचे औचित्य साधून पर्यावरण जनजागृतीसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांत विद्यार्थ्यांनी प्रेरणादायी पोस्टर सादरीकरण, रंगीबेरंगी रांगोळी स्पर्धा केली तसेच महाविद्यालयातील नव्याने स्थापन झालेल्या ग्रीन इको क्लब चे उद्घाटन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी ऊर्जा बचत, ओझोन थर संवर्धन आणि हरित भविष्य या विषयांवर प्रभावी मांडणी केली. या कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, पर्यावरण संवर्धन अधिकारी सन्मती मेस्त्री, ग्रीन क्लब समन्वयक डॉ. किशोर शिंदे, CPCB सल्लागार प्रताप गर्जे, NC-P सल्लागार श्रीमती गीतांजली कोशिक तसेच ग्रीन क्लब विद्यार्थी अध्यक्ष रत्नदिप भुरे उपस्थित होते. मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेचे कौतुक केले व अशा उपक्रमांमुळे युवकांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव जागृत होऊन हरित भविष्य घडविण्यासाठी प्रेरणा मिळते, असे प्रतिपादन केले.

## लातूर येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयात कारवाई अंतर्गत जमा २५ वाहनाने सोडवून घ्यावीत

### पुढील ३० दिवसांत वाहने सोडवून न घेतल्यास लिलावाची कार्यवाही होणार

लातूर :- येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयाने थकीत कर, तडजोड शुल्क आणि पर्यावरण कर न भरलेल्या २५ वाहनांवर कारवाईचा केली आहे. वायुवेग पथकाने मोटार वाहन कायद्यांतर्गत गुन्ह्यांखाली ही वाहने लातूरमधील बाभळगाव रोडवरील परिवहन भवन येथील कार्यालयाच्या आवारात लावून ठेवली आहेत. वाहन मालक, चालक किंवा वित्तदात्यांनी आवश्यक कागदपत्रे सादर करून व थकबाकी भरून ही वाहने सोडवून घ्यावीत, असे आवाहन कार्यालयाने केले आहे. पुढील ३० दिवसांत ही वाहने सोडवून न घेतल्यास ही वाहने बेवारस समजून जाहीर लिलावाद्वारे विक्री केली जाईल. प्राप्त रक्कम शासनाच्या तिजोरीत जमा करून वाहनांची विल्हेवाट लावली जाईल, असे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी आशिषकुमार अय्यर यांनी कळविले आहे. बरेच महिने उलटूनही कोणीही या वाहनांवर हक्क सांगण्यासाठी पुढे आलेले नाही. त्यामुळे ही वाहने खराब होण्याची, गंज चढण्याची आणि त्यांचे मूल्य कमी होण्याची शक्यता आहे. तसेच, पेट्रोल-डिझेल गळतीमुळे आग लागण्याचा धोकाही नाकारता येत नाही. यामुळे वाहनांच्या सुरक्षिततेसाठी वेळ आणि संसाधने खर्च होत आहेत. या संदर्भात उप प्रादेशिक परिवहन अधिकारी आशिषकुमार अय्यर यांनी वाहने सोडवून घेण्याचे आवाहन केले आहे. त्यानुसार ३० दिवसात वाहने सोडवून न घेतल्यास लिलावाची प्रक्रिया www.mstcindia.co.in या संकेतस्थळावर आणि कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर जाहीर केली जाईल. वाहनांची यादी कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रदर्शित करण्यात आली आहे. लिलावाची तारीख, वेळ आणि ठिकाणाची माहितीही संकेतस्थळावर आणि नोटीस बोर्डावर उपलब्ध असेल, असे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे.

## मनपा शाळेचे मुख्याध्यापक शिंदे यांची अचानक बदली केल्यामुळे विद्यार्थी व पालकांनी धरणे आंदोलन केले








लातूर :- लातूर शहर महानगरपालिका सावित्रीबाई फुले शाळा क्रमांक ९ या आदर्श शाळेचे मुख्याध्यापक श्री. शिंदे यांची अचानक बदली करण्यात आल्यानंतर आज विद्यार्थी आणि पालकांनी संताप व्यक्त करत शाळा बंद करून थेट रस्त्यावर धरणे आंदोलन सुरू केले. हीच ती शाळा आहे जिच्यावर शहराचा अभिमान मानला जातो. या शाळेला केंद्र सरकारकडून पीएमश्री शाळा म्हणून बहुमान प्राप्त झाला आहे. शिक्षणक्षेत्रात आदर्श निर्माण करणाऱ्या या शाळेत शिस्त, संस्कार आणि गुणवत्तापूर्ण वातावरण निर्माण करण्यात मुख्याध्यापक शिंदे यांचा सिंहाचा वाटा आहे पूर्वी त्यांच्याच कालावधीमध्ये या शाळेला दहावीचा वर्ग देखील मंजूर करण्यात आलेला होता शाळेचा झपाट्याने होणारा विकास त्यांच्या हातावरती वाढणारी विद्यार्थ्यांची संख्या ही दखलपात्र अशीच आहे.

पालक व विद्यार्थ्यांची भूमिका : पालकांचे म्हणणे आहे की, मुख्याध्यापक शिंदे यांच्यामुळे शाळेत काटेकोर शिस्त आली. मुलांमध्ये आत्मविश्वास, अभ्यासाकडे ओढ आणि सांस्कृतिक जाणीवा वाढल्या. एवढे यश मिळवून दिलेल्या मुख्याध्यापकांची केवळ सव्वा वर्षांत बदली होणे हा सरळ अन्याय आहे.

नियमांचा भंग : शासनाच्या परिपत्रकानुसार, पीएमश्री शाळांमधील मुख्याध्यापकांची किमान ५ वर्षे बदली होऊ नये अशी अट आहे. तरीसुद्धा केवळ सव्वा वर्षांतच मुख्याध्यापक शिंदे यांची बदली करण्यात आली. हा प्रकार शासनाच्या स्वतःच्या नियमांना हरताळ फासणारा असून शिक्षणाबाबत असलेली असंवेदनशीलता अधोरेखित करणारा आहे.

आंदोलनाची ठिणगी : मुख्याध्यापकांच्या बदलीविरोधात आज सकाळपासूनच विद्यार्थी आणि पालकांनी शाळे समोर धरणे देतं काही काळ शाळा बंद केली. मुख्याध्यापक परत द्या अशा घोषणा देत पालक-विद्यार्थ्यांनी धरणे आंदोलन छेडले. शाळा ठप्प झाल्यामुळे शिक्षणावरही तातडीने परिणाम होईल ही बाब लक्षात येतात महानगरपालिकेचे काही कर्मचारी यासोबतच गांधी चौक पोलीस विभागाचे पोलीस कर्मचारी या परिसरात दाखल झाले यांच्या मध्यस्थीच्या नंतर रस्त्यावर आंदोलन करणाऱ्या मुलांना शाळेच्या वर्गामध्ये नेऊन बसवण्यात आल पीएमश्री शाळेला दिलेल्या मानाचा आदर का राखला जात नाही? सव्वा वर्षांतच शिस्तप्रिय मुख्याध्यापक का हटवले गेले? विद्यार्थ्यांच्या उज्वल भवितव्यासाठी घडवलेल्या वातावरणाचा बळी कोणाच्या आदेशाने घेतला जात आहे? शिक्षणाचे राजकारण करणाऱ्यांमुळे मुलांच्या भविष्यास कोण जबाबदार? लातूर शहरातील ही एकमेव पीएमश्री शाळा आज बदलीच्या निषेधार्थ बंद असल्याने जिल्हा प्रशासनावर गंभीर प्रश्नचिन्हे उभे राहिले आहे. पालक व विद्यार्थ्यांच्या रोषामुळे या प्रकरणाचे वेळेत निराकरण झाले नाही, तर हे आंदोलन आणखी भडकण्याची चिन्हे आहेत.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE